# मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

(बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून)

क्र. झोपुप्रा/स.प्रा.ठा-४//कावि ७०४/२०२५
दिनाकः- १७/०९/२०२५

**वाचले :-** १) प्राधिकरणाकडील परिपत्रक क्रमांक १४, क्रमांक मुंमप्र,झोपुप्रा/परिपत्रक/१६/२०२१ दि.२८/०५/२०२१

२) सक्षम प्राधिकारी तथा उपायुक्त, समाज विकास विभाग,ठाणे महानगरपालिका,ठाणे यांचेकडील झोपडीधारकांची पात्र/अपात्र बाबतचे परिशिष्ट-२, दि.२४/०५/२०१६

३) श्रीम.पुष्पा शकील सरोज यांनी प्राधिकरणात सादर केलेला दि.०६/१२/२०२४ रोजीचा अर्ज.

---

## आदेश

मौजे पाचपाखाडी,अं.भू.क्र.६७ या मिळकतीवरील अजिंक्य महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण संस्थेचे परिशिष्ट-२ हे संदर्भ क्रमांक २ अन्वये तयार केलेले आहे. सदर योजनेच्या अंतिम परिशिष्ट-२ मधील अ.क्र. १३३ झोपडी क्र. १२६ वर श्रीम.बदामीदेवी शिवनाथ सरोज यांना निवासी कारणास्तव पात्र केले आहे.

झोपडीधारक बदामीदेवी शिवनाथ सरोज हे दि. ०४/१०/२०२० रोजी मयत झाले आहेत. त्यांची मुलगी श्रीम.पुष्पा शकील सरोज व श्रीम.वंदना राजेश सरोज यांनी बदामीदेवी शिवनाथ सरोज यांचे नावाऐवजी परिशिष्ट-२ मध्ये वारस नोंद लावण्याबाबत दि. ०६/१२/२०२४ रोजीच्या अर्जान्वये विनंती केली आहे. त्यानुसार दि.३१/००१/२०२५ रोजी सूनावणी घेण्यात आली सुनावणीचे वेळी श्रीम.पुष्पा शकील सरोज (लग्नापुर्वी पुष्पा शिवनाथ सरोज) व श्रीम.वंदना राजेश सरोज(लग्नापुर्वी वंदना शिवनाथ सरोज) हजर होते. अर्जदार यांनी खालीलप्रमाणे पुरावे सादर केलेले आहेत.

१) प्राथमिक स्वास्थ केंद्र कर्मा,उत्तर प्रदेश सरकार येथील बदामीदेवी शिवनाथ सरोज यांचा मृत्यू दि.०४/१०/२०२० रोजी झालेबाबत नोंदणी क्र.D-२०२३ ९ ८४६५४५६ दि.२१/०७/२०२१ रोजी नोंदणी केलेले मृत्यु प्रमाणपत्र.

२) ठाणे महानगरपालिकेकडील शिवनाथ जगरदेव सरोज यांचा मृत्यू दि.१५/०६/२००४ रोजी झालेबाबत नोंदणी क्र.२५९५ दि. २१/०६/२००४ रोजी नोंदणी दि.०७/०१/२०१० रोजीचे मृत्यु प्रमाणपत्र.

३) आधारकार्ड क्र.७११७०००७९०६४ बदामीदेवी शिवनाथ सरोज यांचे नावे

४) भारत निवडणूक ओळखपत्र क्र.MT/१०/०५३/०३३१२६८ बदामीदेवी शिवनाथ सरोज यांचे नावे

५) भारत निवडणूक ओळखपत्र क्र.MT/१०/०५३/०३३१२६७ शिवनाथ जगरदेव सरोज यांचे नावे

६) शिधापत्रिका क्र. SA No. ७९०५७७ बदामीदेवी शिवनाथ सरोज यांचे नांवे

७) महावितरणाकडील विद्युत देयक ग्रा.क्र. ००००१९१९९९०८(p.d.) दि. ३०/१२/२०२२ शिवनाथ जगरदेव सरोज यांचे नांवे (विद्युत पुरवठा कायम बंद केला आहे.)

८) श्रीम.पुष्पा शकील सरोज व श्रीम.वंदना राजेश सरोज यांचे रु. १००/- स्टॅम्प पेपरवर दि. ०३/१२/२०२४ रोजी केलेले नोटराईज्ड हमीपत्र.

९) आधारकार्ड क्र.३६९७३०७९५३७६ श्रीम.पुष्पा शकील सरोज (लग्नापुर्वी पुष्पा शिवनाथ सरोज) यांचे नावे

१०) आधार कार्ड क्र. ५०९४७५८२९५५७ श्रीम.वंदना राजेश सरोज (लग्नापुर्वी वंदना शिवनाथ सरोज) यांचे नांवे

११) मुख्यप्रवर्तक, अजिंक्य महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण सोसायटी लि., ठाणे यांचे श्रीम.पुष्पा शकील सरोज व श्रीम.वंदना राजेश सरोज यांचे नावे दि. ३१/०१/२०२५ रोजीचे पत्र.

अर्जदार यांनी सुनावणीच्या वेळी सादर केलेले पुरावे व सत्यप्रतिज्ञापत्र/हमीपत्र यानुसार मयत झोपडीधारक बदामीदेवी शिवनाथ सरोज यांना १) श्रीम.पुष्पा शकील सरोज व श्रीम.वंदना राजेश सरोज (मुलगी) असे वारस असल्याचे दिसुन येते.

सबब, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई महानगर प्रदेश, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे यांचे परिपत्रक क्र. १४, क्रमांक मुंमप्र,झोपुप्रा/परिपत्रक/१६/२०२१ दि.२८/०५/२०२१ मधील मार्गदर्शक सुचनांच्या अधिन राहून विषयांकित सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या अंतिम परिशिष्ट-२ मधील अ.क्र. १३३ झोपडी क्र. १२६ वरील झोपडीधारक मयत बदामीदेवी शिवनाथ सरोज ह्या दि. ०४/१०/२०२० तसेच त्यांचे पती शिवनाथ जगरदेव सरोज हे दि. १५/०६/२००४ रोजी मयत झाले असल्याने त्यांचे वारस म्हणून,१)श्रीम.पुष्पा शकील सरोज (लग्नापुर्वी पुष्पा शक्कील सरोज)(मुलगी) २) श्रीम. वंदना राजेश सरोज (लग्नापुर्वी वंदना शिवनाथ सरोज) (मुलगी) यांचे नांवाची संयुक्तपणे वारस म्हणून नोंद घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदरचा आदेश हा अजिंक्य महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परिशिष्ट-२ मधील अ.क्र. १३३ झोपडी क्र. १२६ पुरता मर्यादीत राहील. सदरच्या आदेशाचा इतर कोणत्याही शासकीय कामासाठी वापर करता येणार नाही. सदर पुराव्याबाबत काही तक्रारी प्राप्त झाल्यास किंवा सादर केलेले पुरावे व माहिती खोटी असल्याचे भविष्यात सिध्द झाल्यास सदरचा आदेश रद्द समजण्यात येईल व त्याबाबतची सर्व जबाबदारी भारतीय पुरावा कायदा कलम १०१ व १०२ व भारतीय दंड संहिता कोड १८६० चे कलम १७७, १९९, १९२(अ), २००, ४२०, ४६५, ४६८ व ४७१ नुसार कागदपत्रे देणाऱ्या व्यक्तीची राहील व खोटे कथन करणारी व्यक्ती उक्त कायदयान्वये होणाऱ्या शिक्षेस पात्र असेल.

(मिनल पालांडे)
**सक्षम प्राधिकारी-४**
**मुंबई महानगर प्रदेश**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,ठाणे**

**प्रत:-**

१.कार्यकारी अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे

२.सहा.निबंधक सहकारी संस्था झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे.

३.अध्यक्ष/सचिव अजिंक्य महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण संस्था

४. श्रीम.पुष्पा शकील सरोज (लग्नापुर्वी पुष्पा शक्कील सरोज)(मुलगी)

५. श्रीम. वंदना राजेश सरोज (लग्नापुर्वी वंदना शिवनाथ सरोज) (मुलगी)